जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JUL 2024
पुढारी

# 'दूरशिक्षण' एमबीएची २१ रोजी फेरपरीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने एमबीए (डिस्टन्स) च्या प्रवेशासाठी २१ जुलै रोजी फेरपरीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी रिक्त जागांकरिता अर्ज मागविण्यात आले आहेत. गुरुवार, दि. १८ ही ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे. ज्या विद्यार्थ्यांनी राज्य शासन व भारत सरकारच्या कोणत्याही सांविधानिक संस्था किंवा एटीएमएतर्फे घेतल्या जाणाऱ्या व्यवस्थापन विषयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता पदव्युतर पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेली सीईटी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांना एमबीएला थेट प्रवेश दिला जाणार आहे. पात्र विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू असणार नाही. विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी https:/// www. unishivaji. ac. in/ distedu/ notice_ board. aspx या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JUL 2024
पुढारी

# विद्यापीठाकडून ७२४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदवी, पदव्युत्तरच्या ७२४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या वतीने एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी एमएस्सी (बॉटनी) या अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JUL 2024
तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ७२४ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. आत्तापर्यंत ७२४ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले. सोमवारी झालेल्या परीक्षांमध्ये भरारी पथकाकडून प्रतिन्ही जिल्ह्यातून कॉपीच्या प्रकाराची एकही नोंद झालेली नाही.तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JUL 2024
लोकमत

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## • दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र •

## एम.बी.ए. (Distance) करिता प्रवेशाची सुवर्णसंधी

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता एम.बी.ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहे. त्यांकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत गुरुवार, दि १८ जुलै, २०२४ आहे.

## फेर प्रवेश परीक्षा - रविवार, दि. २१ जुलै २०२४

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासन अथवा भारत सरकारच्या कोणत्याही सांविधानिक संस्था किंवा ATMA तर्फे घेतल्या जाणाऱ्या व्यवस्थापन (Management) विषयात शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेली प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेले आहेत; अशा विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या 'एम.बी.ए. (Distance)' अभ्यासक्रमाला थेट प्रवेश घेण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे. अशा पात्र विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे वरीलप्रमाणे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू नसेल याची नोंद घ्यावी. तरी सदरच्या प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा.

तसेच याबाबतची सविस्तर माहिती व सूचना http://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx या संकेतस्थळावर पहावी.

**फेर प्रवेश परीक्षेस अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा...**

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : ०९/०७/२०२४
जा. क्र. सीडीओई/१०२३

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JUL 2024
सकाळ

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) With CGPA 3.52

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## एम.बी.ए. (Distance) करिता प्रवेशाची सुवर्णसंधी

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता एम.बी.ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परिक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **गुरुवार, दि.१८ जुलै,२०२४** आहे.

### फेर प्रवेश परीक्षा- रविवार, दि. २१ जुलै, २०२४

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासन अथवा भारत सरकारच्या कोणत्याही सांविधानिक संस्था किंवा ATMA तर्फे घेतल्या जाणाऱ्या व्यवस्थापन (Management) विषयात शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेली प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेले आहेत ; अशा विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या 'एम.बी.ए. (Distance)' अभ्यासक्रमाला थेट प्रवेश घेण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे. अशा पात्र विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे वरीलप्रमाणे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू नसेल याची नोंद घ्यावी. तरी सदरच्या प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा.

तसेच याबाबतची सविस्तर माहिती व सुचना https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx या संकेतस्थळावर पहावी.

**फेर प्रवेश परीक्षेस अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा...**

ठिकाण: कोल्हापूर
दिनांक : ०९/०७/२०२४
जा.क्र. सीडीओई/१०२३

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
**कुलसचिव**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JUL 2024
पुढारी

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## एम.बी.ए. (Distance) करिता प्रवेशाची सुवर्णसंधी

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता एम.बी.ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परिक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत गुरुवार, दि.१८ जुलै.२०२४ आहे.

## फेर प्रवेश परीक्षा- रविवार, दि. २१ जुलै. २०२४

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासन अथवा भारत सरकारच्या कोणत्याही सांविधानिक संस्था किंवा ATMA तर्फे घेतल्या जाणाऱ्या व्यवस्थापन (Management) विषयात शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेली प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेले आहेत ; अशा विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या 'एम.बी.ए. (Distance)' अभ्यासक्रमाला थेट प्रवेश घेण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे. अशा पात्र विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे वरीलप्रमाणे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू नसेल याची नोंद घ्यावी. तरी सदरच्या प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा.

तसेच याबाबतची सविस्तर माहिती व सुचना https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx या संकेतस्थळावर पहावी.

फेर प्रवेश परीक्षेस अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा...

ठिकाण: कोल्हापूर
दिनांक : ०९/०७/२०२४ डॉ. व्ही. एन. शिंदे
जा.क्र. सीडीओई/१०२३ कुलसचिव

09 JUL 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# बनावट प्रमाणपत्राची शिवाजी विद्यापीठाकडून गंभीर दखल

## आता थेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या नावाचा वापर करून बनावट प्रमाणपत्र, पदवी तयार करण्याच्या प्रकाराची प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. याप्रकरणी आता थेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश कुलगुरूंनी संबंधित विभागास दिले आहेत.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २९५ महाविद्यालये असून, सुमारे २ लाख ५० हजारांहून अधिक विद्यार्थी सध्या शिक्षण घेत आहेत. पदविका, पदवी, पदव्युत्तरचे शिक्षण पूर्ण करून काही विद्यार्थी इतर राज्यांत व परदेशात शिक्षण व नोकरीसाठी अर्ज करतात. त्यावेळी कंपनी व शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाते. ती कागदपत्रे संबंधित विद्यापीठाकडे पाठवून



खातरजमा केली जाते.

गेल्या तीन महिन्यांत विद्यापीठाच्या नावाचा वापर करून दूरशिक्षण विभागाचे बी.कॉमचे बोगस प्रमाण तयार करण्याचे दोन प्रकार उघडकीस आले आहेत. काही दिवसांपूर्वी क्रीडा विभागाची बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी विद्यापीठाने पोलिसांत तक्रार दिली होती. त्यावर अद्याप कारवाई झालेली नाही. नुकतेच व्यवस्थापन अभ्यासक्रमाची बनावट पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक चीनमधील एका कंपनीस सादर केल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणाची परीक्षा विभागाने गंभीर दखल घेतली असून, प्रकरणाची युद्धपातळीवर माहिती घेण्याचे काम सध्या सुरू आहे.

> “ चीनमध्ये बनावट पदवीप्रमाणपत्र सादर केल्याची माहिती समजली आहे. त्याअनुषंगाने परीक्षा विभागाकडून तत्काळ कारवाई करण्यात आली असून, माहिती घेतली जात आहे. लवकरच याप्रकरणाच्या मुळाशी जाऊन संबंधिताविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल केला जाईल.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ